नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

**दिनांक २४/०२/२०२२ (गुरूवार)**

**(सायंकाळ)**

---

# उमरेड ब्राम्हणी प्रकरणातील आरोपीचे जामीन सत्र न्यायालयाने सुध्दा फेटाळली

पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत मौजा ब्राम्हणी येथे दिनांक १७.०१.२०२२ रोजी गावात आयोजकांनी दिवसा शंकर पटाचा कार्यक्रम आयोजित करून रात्री ला सांस्कृतीक कार्यक्रम केला. त्यामध्ये महिलांचे आंतर वस्त्रांवर अश्लिल नृत्य करण्यात आले होते. सदर विभत्स नृत्याचा व्हिडीओ माध्यंमात प्रसारित झाल्यावरून पोलीस स्टेशन उमरेड येथे दिनांक २२.०१.२०२२ रोजी अप.क्र. ३३/२२ कलम २९४, १८८, ११४,३४ भादंवि सहकलम ६७ (अ) माहिती तंत्रज्ञान कायदा सहकलम १३१ (अ), ११०, ११२, ११७ मपोका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

गुन्हा दाखल होताच श्री. विजयकुमार मगर, पोलीस आधीक्षक नागपूर ग्रामीण यांनी या गुन्हयाचा तपास करण्यासाठी विशेष तपास पथकाची नेमणुक केलेली होती. त्यामध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पुजा गायकवाड, महिला सहायक पोलीस निरीक्षक शुभांगी वाझे तसेच पोलीस हवालदार संजय बांते, किशोर डेकाटे, पोलीस नायक प्रविण देवारे, बावने, महिला पोलीस अंमलदार नजमा शेख यांची तपास पथकात नियुक्ती केली होती.

सदरच्या कार्यक्रमाला आयोाजिकांनी कोणतीही परवानगी न घेता कार्यक्रम केला होता. गुन्हा दाखल होताच सदर च्या गुन्हयात १३ आरोपीतांना अटक करण्यात आलेली आहे. ०३ आरोपीतांना सुचनापत्रावर सोडण्यात आलेले आहे. अटक १३ आरोपींतामध्ये गावातील अश्लील व विभत्स नृत्य आयोजित करणारे आयोजक व त्यांना सहकार्य करणारे तसेच नृत्य करणारे ॲलेक्स डान्स ग्रुपमधील पुरूष कलाकार यांचा समावेश होता. सदर पथकांनी गुन्हयाचा तपास करून महत्वाचे पुरावे गोळा केले व न्यायालयाचे निदर्शनास आणुन दिले. त्यामध्ये आरोपीतांची मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी कोर्ट उमरेड व मा. सत्र न्यायालय नागपूर यांनी आरोपीतांचा जामिन फेटाळला असल्याने आरोपी ०१ महिण्यापासुन मॅजिस्टेड कस्टडी जेल मध्ये आहेत. जामिन होवु नये याकरीता उमरेड येथील न्यायालयामध्ये सरकारी अभियोक्ता श्रीमती आवारीकर मॅडम व सत्र न्यायालयातील सरकारी अभियोक्ता श्रीमती नायर मॅडम यांनी जामिन होवु नये याकरीता प्रखर युक्तीवाद केला.

आरोपींची एक महिण्यापासुन जामिन न झाल्याने अश्लिल व विभत्स डांस कार्यक्रमाचे आयोजन करणारे त्यांना मदत करणारे तसेच डांस ग्रुप यांमध्ये भिती निर्माण झालेली असुन अशा प्रकारचे कार्यक्रम करायला. यापुढे कुणीही हिम्मत करणार नाही.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर